# कार्यकारी सारांश- टाटा पॉवर- पारेषण एमटीआर

टाटा पॉवर- टी साठी आर्थिक वर्ष २०१५-१६, आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी कामगिरी पाहणी आणि आर्थिक वर्ष २०१८-२०१९ आणि २०१९-२० साठी एआरआर

**अनुक्रमणिका**

१. टाटा पॉवर- पारेषण उद्योग एमटीआर याचिका - कार्यकारी सारांश

१.१ विद्यमान सादरीकरणाबाबत एकूण दृष्टिकोन

१.२ टाटा पॉवर- पारेषण

१.३ विद्यमान याचिकेअंतर्गत सादरीकरणे

१.४ विविध आदेशांचे परिणाम

१.५ आर्थिक वर्ष २०१५-१६, आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी तात्पुरते अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१८-२०१९ आणि २०१९-२० साठी अंदाज

१.६ भांडवलीकरण

१.७ टाटा पॉवरच्या निर्मिती उद्योगाकडून पारेषणाकडे मालमत्तांचे हस्तांतरण

१.८ समभागांवर परतावा (आरओई)

१.९ व्याज आणि वित्त शुल्क

- कर्जावर व्याज
- चालू भांडवलावर व्याज
- इतर वित्तीय भांडवल

१.१० घसारा

१.११ देखभाल आणि कार्यान्वयन खर्च

१.१२ प्राप्तीकर

१.१३ आपत्कालीन साठ्यात योगदान

१.१४ दरेतर उत्पन्न

१.१५ पारेषण उपलब्धतेवर फायदे

१.१६ एकूण महसुली आवश्यकता

१.१७ आर्थिक वर्ष २०१५-१६, आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी तफावत/ (अतिरिक्त) आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी तात्पुरती तफावत/ (अतिरिक्त)

१.१८ मागील वसुलींसह एआरआर

१.१९ माननीय आयोगाला विनंती

## १. टाटा पॉवर- पारेषण उद्योग एमटीआर याचिका- कार्यकारी सारांश

### १.१ विद्यमान सादरीकरणाप्रति एकूण दृष्टिकोन

**ऐतिहासिक दृष्टिकोन :**

१. टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (टाटा पॉवर) ही कंपनी १९१९ साली स्थापन झाली आहे. १ एप्रिल २००० रोजी, टाटा हायड्रो इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१० साली स्थापन झालेली) आणि आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१६ साली स्थापन झालेली) यांचे विलिनीकरण टाटा पॉवरमध्ये करून एकच आस्थापना स्थापन करण्यात आली. या विलिनीकरणानंतर उक्तनिर्देशित कंपन्यांच्या अनुज्ञप्त्यांचेही विलिनीकरण करण्यात आले आणि टाटा पॉवरला महाराष्ट्र शासनाकडून (म.शा.) आपल्या मुंबई अनुज्ञप्ती क्षेत्रात आणि मोठ्या प्रमाणावरील वितरण अनुज्ञप्तीधारकांना वीजपुरवठा करण्यासाठी ठराव क्रमांक आयईए-२००१/ सीआर-१९५०९/ एनआरजी-१/ दिनांक १२ जुलै २००१ द्वारे अनुज्ञप्ती देण्यात आली.

२. उक्तनिर्देशित अनुज्ञप्त्या १५ ऑगस्ट २०१४ रोजीपर्यंत वैध होत्या. त्यानंतर, टाटा पॉवरच्या पारेषण उद्योगाने (टाटा पॉवर-टी) खटला क्रमांक २०१४ चा ११२ मध्ये पारेषण अनुज्ञप्ती प्रदान करण्यासाठी अर्ज सादर केला होता. माननीय आयोगाने १४ ऑगस्ट २०१४ रोजी टाटा पॉवरला मुंबई क्षेत्रामध्ये आणि बाहेरील बाजूस स्थित टाटा पॉवरच्या मालकीच्या किंवा टाटा पॉवरने भविष्यात बांधण्याचे आणि मालकी घेण्याचे प्रस्तावित असलेली आणि महाराष्ट्राच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा भाग असलेल्या पारेषण वाहिन्या आणि रिसिव्हिंग स्टेशन्ससाठी (किंवा पारेषण रिसिव्हिंग स्टेशन्स) १६ ऑगस्ट २०१४ पासून २५ वर्षांच्या कालावधीसाठी पारेषण अनुज्ञप्ती दिली.

### १.२ टाटा पॉवर- पारेषण

३. टाटा पॉवर-टी ही महाराष्ट्रातील परवानाधारकांपैकी एक असून तिने मुंबईत १०० वर्षे आपले कार्यान्वयनाचे काम पूर्ण केले आहे. कार्यान्वयनाच्या या वर्षांदरम्यान, टाटा पॉवर-टीने सातत्याने एक विश्वासू, तांत्रिकदृष्टया अद्ययावत आणि वर्गातील सर्वोत्तम पारेषण साखळी मुंबई आणि आसपासच्या परिसरातील ग्राहकांसाठी उपलब्ध असेल याची खातरजमा केली आहे.

४. पारेषण साखळी ग्राहकांना वीजवितरण करण्यासाठी निर्मिती स्थानके आणि भार केंद्रांमध्ये एक महत्त्वाचा दुवा ठरते. पारेषण उद्योग एककात रिसिव्हिंग स्टेशन्स आणि पारेषण वाहिन्यांचा समावेश आहे. पारेषण व्यवसाय

एककात रिसिव्हिंग स्टेशन्स आणि पारेषण वाहिन्यांचा समावेश आहे. टाटा पॉवर- टीची रिसिव्हिंग स्टेशन्स मुंबई आणि आसपासच्या परिसरात पसरलेली आहेत. विविध उच्च व्होल्टेजवरील पारेषण वाहिन्या ज्यात ईएचव्ही भूमिगत वाहिन्या/ केबल्स मुंबईमध्ये आणि आसपासच्या परिसरात पसरल्या आहेत आणि महाराष्ट्रातील औष्णिक तसेच जलविद्युत निर्मिती केंद्रांशी जोडलेल्या आहेत. रिसिव्हिंग स्टेशन्स आणि पारेषण वाहिन्या ज्यात ईएचव्ही केबल्सचे कार्यान्वयन आणि देखरेख टाटा पॉवर-टी मधील कौशल्यपूर्ण आणि प्रशिक्षित अभियंते आणि कर्मचाऱ्यांकडून केले जाते.

५. २०१४-१५ या वर्षात घडून आलेल्या अलीकडील ग्रिडमधील कोंडीच्या घटनांपासून सुटका करण्यासाठी, टाटा पॉवर- टीने वचनबद्ध पद्धतीने एसटीयू योजनांना पाठिंबा दिला आणि नियत कालावधीत खालील पारेषण वाहिन्यांचे कार्यान्वयन केले आणि मुंबई शहरात वीज आयात करण्यासाठी ८०० मेगावॉटच्या अतिरिक्त कॉरिडॉरची निर्मिती केली.

- उच्च ॲम्पासिटी २२० केव्ही कळवा साल्सेट पारेषण वाहिनी क्रमांक ३ (अधिकतम कॉरिडॉरसोबत ३०० मेगावॉट क्षमता)
- उच्च ॲम्पासिटी २२० केव्ही कळवा साल्सेट पारेषण वाहिनी क्रमांक ४ (अधिकतम कॉरिडॉरसोबत ३०० मेगावॉट क्षमता)
- बोरिवली येथे एमएसईटीसीएल आणि टाटा पॉवर- टी यांच्यादरम्यान २२० केव्ही डबल सीकेटी आंतर जोडणी (६०० मेगावॉट क्षमता भर)

उक्तनिर्देशित सर्व पारेषण वाहिन्यांच्या कार्यान्वयनामुळे सुमारे १२०० मेगावॉटच्या पारेषण क्षमतेत भर घातली आहे.

६. मुंबई अनुज्ञप्ती क्षेत्रातील पारेषण यंत्रणेमध्ये आयलँडिंग सुविधा आहे आणि त्यामुळे मुंबईबाहेर ग्रिड बंद पडल्यास मुंबई ग्रिड स्वतंत्र होते आणि मुंबईतील ग्राहकांचा वीजपुरवठा कायम राहतो.

७. टाटा पॉवर-टीची पारेषण साखळी सुमारे १२०० सर्किट किमी आहे आणि त्यात ११० केव्ही आणि २२० केव्ही ओव्हरहेड वाहिन्या आणि एन- १ च्या आधाराने भूमिगत वाहिन्यांचा समावेश आहे. एकूण २१ पारेषण रिसिव्हिंग स्टेशन्स स्थापित करण्यात आले असून त्यांची एकत्रित पारेषण क्षमता ९४०० एमव्हीए आहे.

८. पारेषण वाहिन्या आणि उपकरणांच्या स्थानिक आणि मानवी कार्यान्वयनाबरोबरच, टाटा पॉवरने "निरीक्षण नियंत्रण आणि माहिती ताबा यंत्रणा" स्काडा संपूर्ण पारेषण साखळीमध्ये स्थापित केले असून त्याचे कार्यान्वयन

रिअल टाइम रिमोट मॉनिटरिंग आणि सर्व रिसिव्हिंग केंद्रांच्या नियंत्रणासाठी पॉवर सिस्टिम कंट्रोल सेंटर (पीएससीसी)कडून केले जाते. यामुळे कार्यान्वियन वेगवान होते आणि रिमोट कार्यान्वयनाद्वारे वीजपुरवठा बंद पडल्यास पारेषण यंत्रणा वापरकर्त्यांसाठी (टीएसयू) वीजपुरवठा नियमित होण्याचा कालावधी कमी होतो.

**१.३ सदर याचिकेअंतर्गत सादरीकरणे**

९. टाटा पॉवर-टीने या याचिकेअंतर्गत विविध वर्षांसाठी खालील सादरीकरणे केली आहेत:

- टाटा पॉवर-टी एआरआरवर विविध आदेशांचा परिणाम
- प्रत्यक्ष कामगिरीवर आधारित आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी अचूक समायोजन.
- प्रत्यक्ष कामगिरीवर आधारित आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी अचूक समायोजन.
- आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी अंदाजांचे तात्पुरते अचूक समायोजन.
- आर्थिक वर्ष २०१७-१८च्या शेवटी तफावत/अतिरिक्त
- आर्थिक वर्ष २०१८-१९ ते आर्थिक वर्ष २०१९-२० साठी सुधारित अंदाज
- सूचनांच्या पूर्ततेची स्थिती

१०. सादरीकरणाचा थोडक्यात सारांश पुढे सादर केल्याप्रमाणे आहे :

**१.४ विविध निकालपत्रांचा परिणाम**

११. टाटा पॉवर-टीने या याचिकेचा भाग म्हणून टाटा पॉवर-टीच्या ३० जून २०१६ रोजीच्या खटला क्रमांक २०१६ च्या २२ मधील एमवायटी आदेशाच्या पुनर्रिक्षणासंबंधीच्या खटला क्रमांक २०१६ च्या ११० मधील १९ जुलै २०१७ रोजीच्या आदेशाच्या परिणामांचा विचार केला आहे. त्याचा परिणाम खालीलप्रमाणे सादर करण्यात आला आहे:

१२. खटला क्रमांक २०१६ चा ११०च्या आदेशामध्ये उपस्थित करण्यात आलेल्या पाच समस्यांपैकी माननीय आयोगाने, पूर्ण विचारांती (१) बीकेसी येथे १४५ केव्ही उपकेंद्रासाठी २१.७४ कोटी रूपयांच्या आयडीसीचे भांडवलीकरण आणि (२) टाटा पॉवर-टीला १.५३ कोटी रूपयांची अतिरिक्त रक्कम सुधारित निकषात्मक ओॲण्डएम खर्चासाठी निव्वळ कार्यक्षमता मालकीच्या स्वरूपात देण्याबाबत पुनर्रिक्षण केले आहे.

१३.खटला क्रमांक २०१६ चा ११० मध्ये माननीय आयोगाच्या आदेशानुसार आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी एकूण वसुलीचा सारांश खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे आहे:

**तक्ता: १.१ आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी एकूण वसुलीचा सारांश**

रूपये कोटींमध्ये

| **तपशील** | **पुनर्रिक्षण आदेशात मान्यताप्राप्त** |
|---|---|
| अतिरिक्त भांडवलीकरणाचा परिणाम | |
| कर्जावर व्याज | ०.८३ |
| समभागांवर परतावा | ०.५१ |
| **एकूण** | **१.३३** |
| ओअ‍ॅण्डएम निव्वळ मालकीवर परिणाम  अतिरिक्त ओअ‍ॅण्डएम मालकी | १.५३ |
| **एकूण परिणाम** | **२.८६** |

## १.५ आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी तात्पुरते अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१८-२०१९ आणि २०१९-२० साठी अंदाज

१४. टाटा पॉवर- टीने पुढे आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी तात्पुरते अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१८-२०१९ आणि २०१९-२० साठी अंदाज या उद्दिष्टासाठी लागू असलेल्या नियमावलीनुसार एआरआरच्या विविध घटकांसाठी सादर केले आहेत:

## १.६ भांडवलीकरण

१५. आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी प्रत्यक्ष भांडवली खर्च आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी अंदाजित भांडवली खर्च आणि भांडवलीकरण आणि आर्थिक वर्ष २०१८-१९ ते आर्थिक वर्ष २०१९-२० या नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावित भांडवली खर्च आणि भांडवलीकरण खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे आहे:

## तक्ता १-२: भांडवली खर्च आणि भांडवलीकरण (आर्थिक वर्ष २०१५-१६ ते आर्थिक वर्ष २०१९-२०)

रूपये कोटींमध्ये

| वर्गवारी | भांडवली खर्च | | | | | भांडवली करण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक वर्ष २०१५-१६ | आर्थिक वर्ष २०१६-१७ | आर्थिक वर्ष २०१७-१८ | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० | आर्थिक वर्ष २०१५-१६ | आर्थिक वर्ष २०१६-१७ | आर्थिक वर्ष २०१७-१८ | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० |
| डीपीआर | २३७.८६ | १८०.११ | १६९.५८ | ४०७.६० | ६४२.१० | २२८.१८ | १५६.५६ | २१६.७५ | २९७.१५ | ४३२.६७ |
| बिगर डीपीआर | ३६.३४ | २४.३८ | २८.६६ | २६.८९ | १०.२५ | ३८.७८ | ३०.९७ | २८.७० | ३७.२६ | २३.९७ |
| एकूण | २७४.२० | २०४.४९ | १९८.२४ | ४३४.४९ | ६५२.३५ | २६६.९६ | १८७.५३ | २४५.४५ | ३३४.४० | ४५६.६४ |

१.७ टाटा पॉवरच्या निर्मिती उद्योगाकडून पारेषण उद्योगाकडे मालमत्तांचे हस्तांतरण

१६. टाटा पॉवर-जीच्या तुर्भे निर्मिती केंद्रावर १५० मेगावॉट युनिट ४चे कार्यान्वयन आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये बंद झाल्यावर, ११० केव्ही स्विचयार्ड, २२ केव्ही स्विचयार्ड आणि सर्व संबंधित उपकरणे आता फक्त पारेषण रिसिव्हिंग स्थानक म्हणून काम करते. त्यामुळे, विद्युत कायदा २००३ नुसार आर्थिक वर्ष २०१७-१८ दरम्यान या मालमत्ता टाटा पॉवर-टीला हस्तांतरित करण्याचे प्रस्तावित आहे. सुरूवातीचा जीएफए, सुरूवातीचे समभाग आणि सुरूवातीचे कर्ज यांच्यावरील परिणाम खालील तक्त्यात नमूद करण्यात आले आहेत:

## तक्ता १-३: आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी मालमत्तांच्या हस्तांतरणासह जीएफए

**रूपये कोटींमध्ये**

| तपशील | | आर्थिक वर्ष २०१७-१८ |
|---|---|---|
| आर्थिक वर्ष २०१७-१८चा सुरूवातीचा जीएफए | अ | ३१६३.६० |
| हस्तांतरित करण्याच्या मालमत्तांच्या जीएफएमध्ये बेरीज | ब | ५३.९४ |
| हस्तांतरित करण्याच्या मालमत्तांसह सुरूवातीचा जीएफए | क- अ ब | ३२१७.५५ |

**तक्ता १-४: आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी मालमत्तांच्या हस्तांतरणासह सुरुवातीचे समभाग**

रूपये कोटींमध्ये

| तपशील | | आर्थिक वर्ष २०१७-१८ |
|---|---|---|
| आर्थिक वर्ष २०१७-१८चे सुरुवातीचे समभाग | अ | १०३८.५१ |
| हस्तांतरित करण्याच्या मालमत्तांच्या समभागांची बेरीज | ब | १६.१८ |
| हस्तांतरित करण्याच्या मालमत्तांसह सुरुवातीचे समभाग | क- अ ब | १०५४.७० |

**तक्ता १-५: आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी हस्तांतरण करण्याच्या मालमत्तांसाठी सुरुवातीचे कर्ज**

रूपये कोटींमध्ये

| कर्ज | | आर्थिक वर्ष २०१५-१६ | आर्थिक वर्ष २०१६-१७ |
|---|---|---|---|
| सुरुवातीची शिल्लक | अ | ०.०० | १४.४८ |
| वर्षभरात समाविष्ट केलेल्या मालमत्ता | ब | २३.४१ | १५.८३ |
| कर्जाची भर | क- ब ७० टक्के | १६.३९ | ११.०८ |
| पुनर्परतावा- घसारा | ड | -१.९० | -५.९० |
| **अंतिम** | **इ- अ क ड** | **१४.४८** | **१९.६७** |

१७. आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी एआरआर सुधारित जीएफए, समभाग आणि मालमत्तांच्या हस्तांतरणामुळे कर्ज यांचा विचार करून काढण्यात आला असून ते खालील तक्त्यात सादर करण्यात आले आहे :

## १.८ समभागांवर परतावा (आरओई)

१८. एमवायटी नियमावली २०११ च्या संदर्भात, टाटा पॉवर- टीने आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीसाठी प्रत्यक्ष भांडवलीकरण आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी एमवायटी नियमावली २०१५ चा संदर्भ घेऊन आरओईचे मूल्यमापन केले आहे. नियंत्रण कालावधी आर्थिक वर्ष २०१७-१८, आर्थिक वर्ष

२०१८-१९ ते आर्थिक वर्ष २०१९-२० साठी आरओई एमवायटी नियमावली २०१५ नुसार भांडवलीकरणाच्या प्रस्तावित आकडेवारीवर आधारित काढण्यात आला आहे. विविध वर्षांसाठी अचूक समायोजन आणि प्रस्ताव यांच्यासाठी आरओई खाली सादर केल्याप्रमाणे आहे:

**तक्ता १-६: समभागांवर परतावा (आर्थिक वर्ष २०१५-१६ ते आर्थिक वर्ष २०१९-२०)**

कोटी रूपये

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१५-१६ | आर्थिक वर्ष २०१६-१७ | आर्थिक वर्ष २०१७-१८ | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **वर्षाच्या सुरुवातीला नियामकांचे समभाग** | ९१५.६१ | ९८५.३९ | १०५४.७० | ११२८.३३ | १२२८.६५ |
| २. | वजा: वर्षादरम्यान विभांडवलीकरण/ निवृत्त झालेला मालमत्तेचा समभाग | (१०.३१) | (३.१४) | | | |
| ३. | भांडवलीकरण | २६६.९६ | १८७.५३ | २४५.४५ | ३३४.४० | ४५६.६४ |
| ४. | भांडवलीकरणाचा समभाग तुकडा | ८०.०९ | ५६.२६ | ७३.६३ | १००.३२ | १३६.९९ |
| ५. | **वर्षाच्या शेवटी नियामक मालमत्ता** | **९८५.३९** | **१०३८.५१** | **११२८.३३** | **१२२८.६५** | **१३६५.६४** |
| | परताव्याची मोजणी | | | | | |
| ६. | वर्षाच्या सुरुवातीला १५.५टक्के दराने नियामक मालमत्तेवर परतावा | १४१.९२ | १५२.७४ | १६३.४८ | १७४.८९ | १९०.४४ |
| ७. | वर्षभरामध्ये भांडवलीकरणाच्या ५० टक्के दराने नियामकांच्या मालमत्तांवर परतावा | ६.२१ | ४.३६ | ५.७१ | ७.७७ | १०.६२ |
| ८. | **नियामकांवर एकूण परतावा** | **१४८.१३** | **१५७.१०** | **१६९.१८** | **१८२.६७** | **२०१.०६** |

### १.९ व्याज आणि वित्त शुल्क

१९. व्याजापोटी येणारा खर्च खालील तीन विभागांमध्ये मोजण्यात आला आहे:

- कर्जावरील व्याज
- चालू भांडवलावर व्याज
- इतर वित्तीय आकार

- **कर्जावरील व्याज**

२०. आर्थिक वर्ष २०१५-१६ ते आर्थिक वर्ष २०१९-२० या कालावधीसाठी भांडवलीकरणासाठी वित्तपुरवठ्यासाठी घेण्यात आलेल्या कर्जाचे तपशील याचिकेच्या संबंधित विभागांमध्ये तपशीलवार सादर करण्यात आले आहेत. आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि आर्थिक वर्ष २०१६-१७साठी प्रत्यक्षावर आधारित कर्जावरील व्याज रक्कम आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ ते आर्थिक वर्ष २०१९-२० या कालावधीसाठी अंदाजित खालील तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे आहे:

**तक्ता १-७: कर्जावरील व्याज (आर्थिक वर्ष २०१५-१६ ते आर्थिक वर्ष २०१९-२०)**

रूपये कोटी

| तपशील | आर्थिक वर्ष २०१५-१६ | आर्थिक वर्ष २०१६-१७ | आर्थिक वर्ष २०१७-१८ | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|
| कर्जाची सुरूवातीची शिल्लक | ९३५.३६ | १००३.६७ | १०२३.५५ | १०५२.९९ | ११३२.३५ |
| बेरीज | १८६.८७ | १३१.२७ | १७१.८१ | २३४.०८ | ३१९.६५ |
| पुनर्परतावा | ११८.५६ | १३१.०६ | १४२.३७ | १५४.७२ | १७१.५८ |
| कर्जांची शेवटची शिल्लक | १००३.६७ | १००३.८८ | १०५२.९९ | ११३२.३५ | १२८०.४२ |
| एकूण व्याजदर (टक्के) | १०.६९ | १०.४४ | १०.४४ | १०.४४ | १०.४४ |
| **व्याज खर्च** | **१०३.६७** | **१०४.७५** | **१०८.३५** | **११४.०३** | **१२५.८९** |

- **चालू भांडवलावर व्याज**

२१. चालू भांडवलावरील व्याजाचे गणन आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी एमवायटी नियमावलीमध्ये नमूद घटकांवर केले आहे. त्याचप्रमाणे, आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आर्थिक वर्ष २०१९-२० साठी चालू भांडवलावरील व्याजाचे गणन एमवायटी नियमावली २०१५ नुसार केले आहे.

**तक्ता १-८: चालू भांडवलावरील व्याज (आर्थिक वर्ष २०१५-१६ ते आर्थिक वर्ष २०१९-२०)**

रूपये कोटींमध्ये

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१५-१६ | आर्थिक वर्ष २०१६-१७ | आर्थिक वर्ष २०१७-१८ | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुरुवातीच्या एकूण स्थिर मालमत्तांच्या एक टक्क्यावर देखभाल स्पेअर्स | १३.२२ | १३.९६ | १७.०७ | १८.६१ | २०.४१ |
| २. | साठा, साधने आणि माल यांच्या पुस्तकी मूल्याच्या एकूण रकमेच्या एक बारांश | ११.१७ | २९.८७ | ३२.१८ | ३४.६३ | ३७.९७ |
| ३. | पारेषण शुल्काच्या समकक्ष दीड महिना | ५५.६५ | ६३.६३ | ८२.७१ | १०४.९६ | ९६.३० |
| **४.** | **एकूण चालू भांडवल** | **८०.०४** | **१०७.४६** | **१३१.९६** | **१५८.२०** | **१५४.६८** |
| ५. | व्याजदर (टक्के) | १४.७५ | १०.३१ | ९.४९ | ९.४९ | ९.४९ |
| **६.** | **चालू भांडवलावर व्याज** | **११.८१** | **११.०८** | **१२.५२** | **१५.०१** | **१४.६८** |

*आर्थिक वर्ष २०१५-१६: प्रत्येक महिन्याच्या शेवटी साठा, साहित्य आणि पुरवठ्याच्या एकूण रकमेच्या एक बारांश.*

- **इतर वित्त आकार:**

२२. वित्त आकार प्रत्यक्ष स्वरुपात मोजण्यात आले असून ते आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी **०.०३ कोटी** रूपये येतात. उर्वरित नियंत्रण कालावधीसाठी वित्त आकार म्हणजे आर्थिक वर्ष २०१७-१८ ते आर्थिक वर्ष २०१९-२० या कालावधीसाठी निरंक धरण्यात आले आहेत.

### १.१० घसारा

२३. टाटा पॉवर- टीने आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी घसाऱ्याचे गणन एमवायटी नियमावली २०११ मध्ये नमूद नियमावलीनुसार केले असून आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आर्थिक वर्ष २०१९-२० साठी एमवायटी नियमावली २०१५ अंतर्गत केले आहे. यावर आधारित राहून, घसारा खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे येतो:

**तक्ता १-९: घसारा (आर्थिक वर्ष २०१५-१६ ते आर्थिक वर्ष २०१९-२०)**

रूपये कोटींमध्ये

| तपशील | आर्थिक वर्ष २०१५-१६ | आर्थिक वर्ष २०१६-१७ | आर्थिक वर्ष २०१७-१८ | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|
| सुरुवातीचा जीएफए | २७५३.९४ | २९८६.५३ | ३२१७.५५ | ३४६२.९९ | ३७९७.४० |
| **एकूण घसारा** | **११८.५६** | **१३१.०६** | **१४२.३७** | **१५४.७२** | **१७१.५८** |
| सरासरी घसारा (टक्के) | ४.३१ | ४.३९ | ४.४२ | ४.४७ | ४.५२ |

### १.११ ओअॅण्डएम खर्च

२४. आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी कार्यान्वयन आणि देखभाल खर्चाचे गणन अनुक्रमे एमवायटी नियमावली २०११ आणि एमवायटी नियमावली २०१५ मध्ये दिलेल्या निकषांवर आधारित राहून केले आहे. त्याची गणना, प्रत्यक्षात कार्यान्वियित असलेल्या सर्व्हिस बेज आणि वाहिन्यांची लांबी यांचा विचार करून करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०१७-१८ ते आर्थिक वर्ष २०१९-२० साठी एमवायटी नियमावली २०१५ मध्ये दिलेले निकष लागू करून आणि संबंधित वर्षांमध्ये कार्यान्वयनात असलेल्या अंदाजित बेज आणि लांबी यांच्यावर आधारित राहून ओअॅण्डएम खर्च दर्शवण्यात आला आहे. निर्मितीकडून टाटा

पॉवर-टीकडे मालमत्तांच्या हस्तांतरणामुळे बे आणि वाहिन्यांची लांबी यांचे घटक आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये काढण्यात आले आहेत. वरील गोष्टींवर आधारित राहून, ओॲण्डएम खर्च खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे आहे:

**तक्ता १-१० : ओॲण्डएम खर्च (आर्थिक वर्ष २०१५ ते आर्थिक वर्ष २०१९-२०)**

रूपये कोटींमध्ये

| ओॲण्डएम खर्च | आर्थिक वर्ष २०१५-१६ | आर्थिक वर्ष २०१६-१७ | आर्थिक वर्ष २०१७-१८ | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|
| **वर्षासाठी सरासरी बेज** | | | | | |
| ६६ केव्ही आणि ४०० केव्हीदरम्यान | ११९.४४ | १०६.१२ | १२४.०२ | १३५.७० | १४८.९८ |
| ६६ केव्हीपेक्षा कमी | ६१.६० | ५७.१३ | ६५.९४ | ७१.५५ | ७८.५८ |
| **वर्षासाठी सरासरी पारेषण वाहिन्या लांबी** | | | | | |
| ६६ केव्ही आणि ४०० केव्हीदरम्यान | १६.१८ | १४.१४ | १४.८८ | १६.१२ | १७.४१ |
| **निकषात्मक ओॲण्डएम खर्च** | **१९७.२३** | **१७७.३८** | **२०४.८४** | **२२३.३६** | **२४४.९७** |

## १.१२ प्राप्तीकर

२५. माननीय आयोगाने आपल्या टाटा पॉवर टीसाठीच्या खटला क्रमांक २०१६ च्या २२ मधील एमवायटी दरपत्रक आदेशात अंगीकारलेल्या पद्धतीप्रमाणे आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी प्राप्तीकराचे गणन करण्यात आले आहे. आर्थिक वर्ष २०१७-१८ ते आर्थिक वर्ष २०१९-२० साठी प्राप्तीकरचा विचार माननीय आयोगाने अद्ययावत मान्यता दिलेला आहे, म्हणजे आर्थिक वर्ष २०१४-१५ नुसार.

वरील बाबीवर आधारित राहून आर्थिक वर्ष २०१५-१६ ते आर्थिक वर्ष २०१९-२० या कालावधीसाठी प्राप्तीकर खालील तक्त्यात दर्शवण्यात आला आहे.

**तक्ता १-११ : प्राप्तीकर (आर्थिक वर्ष २०१५-१६ ते आर्थिक वर्ष २०१९-२०)**

रूपये कोटींमध्ये

| तपशील | आर्थिक वर्ष २०१५-१६ | आर्थिक वर्ष २०१६-१७ | आर्थिक वर्ष २०१७-१८ | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|
| प्राप्तीकर | ३४.०४ | २३.६७ | २३.६७ | २३.६७ | २३.६७ |

## १.१३ आपत्कालीन साठ्यात योगदान

२६. आपत्कालीन साठ्यातील योगदान आर्थिक वर्ष २०१५-१६ ते आर्थिक वर्ष २०१९-२० साठी सुरुवातीच्या जीएफएच्या ०.२५ टक्के दराने मोजण्यात आले असून ते जीएफएच्या ५ टक्क्यांपेक्षा जास्त नसावे. आर्थिक वर्ष २०१५-१६ पासून आर्थिक वर्ष २०१९-२० या कालावधीसाठी आपत्कालीन साठ्यातील योगदान खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे आहे:

**तक्ता १-१२ : आपत्कालीन साठ्यातील योगदान (आर्थिक वर्ष २०१५-१६ ते आर्थिक वर्ष २०१९-२०)**

रूपये कोटींमध्ये

| तपशील | आर्थिक वर्ष २०१५-१६ | आर्थिक वर्ष २०१६-१७ | आर्थिक वर्ष २०१७-१८ | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|
| आपत्कालीन साठ्यात योगदान | ६.८८ | ७.४७ | ८.०४ | ८.६६ | ९.४९ |

## १.१४ दरेतर उत्पन्न

२७. आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ या कालावधीसाठी टाटा पॉवर-टीने प्रत्यक्ष दरेतर उत्पन्न दिले असून त्यात पुनरावृत्ती होणारे आणि बिगर पुनरावृत्ती घटकांचा समावेश आहे. आर्थिक वर्ष २०१७-१८ ते आर्थिक वर्ष २०१९-२० साठी दरेतर उत्पन्नाची गणना खटला क्रमांक २०१६ चा २२ मधील

एमवायटी आदेशात मान्यताप्राप्त केल्याप्रमाणे केली आहे. आर्थिक वर्ष २०१४-१५ ते आर्थिक वर्ष २०१९-२० साठी दरेतर उत्पन्न खालील तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे आहे:

**तक्ता १-१३ : दरेतर उत्पन्न (आर्थिक वर्ष २०१५-१६ ते आर्थिक वर्ष २०१९-२०)**

रूपये कोटींमध्ये

| तपशील | आर्थिक वर्ष २०१५-१६ | आर्थिक वर्ष २०१६-१७ | आर्थिक वर्ष २०१७-१८ | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|
| दरेतर उत्पन्न | १०८.२० | १६.८९ | १८.११ | १९.४९ | २०.९७ |

## १.१५ पारेषण उपलब्धतेसाठी प्रोत्साहन

२८. आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी टाटा पॉवरच्या पारेषण यंत्रणेची उपलब्धता एमएसएलडीसीने प्रमाणित केल्याप्रमाणे सादर करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०१७-१८ ते आर्थिक वर्ष २०१९-२० या कालवधीसाठी कोणत्याही सवलतीचा विचार करण्यात आलेला नाही. तथापि, संबंधित वर्षांच्या अचूक समायोजनाच्या सादरीकरणाच्या वेळी त्याचे गणन करून दर्शवण्यात आले पाहिजे. आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी विचारात घेण्यात आलेला फायदा खालीलप्रमाणे आहे :

**तक्ता १-१४ पारेषण यंत्रणा उपलब्धतेसाठी फायदा (आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि आर्थिक वर्ष २०१६-१७)**

रूपये कोटींमध्ये

| तपशील | आर्थिक वर्ष २०१५-१६ | आर्थिक २०१६-१७ |
|---|---|---|
| फायदा | ६.८८ | ३.६१ |

## १.१६ एकूण महसुली आवश्यकता:

२९. आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी प्रत्यक्षावर आधारित आर्थिक वर्ष २०१७-१८ ते आर्थिक वर्ष २०१९-२० या कालावधीसाठी विविध घटकांचे अंदाज आणि नफा/ नुकसान यांची देवाणघेवाण विचारात घेऊन विविध वर्षांसाठी एआरआर खालील तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे आहे:

### तक्ता १-१५: एकूण महसुली आवश्यकता (आर्थिक वर्ष २०१५-१६ ते आर्थिक वर्ष २०१९-२०)

रूपये कोटीमध्ये

| तपशील | आर्थिक वर्ष २०१५-१६ | आर्थिक वर्ष २०१६-१७ | आर्थिक वर्ष २०१७-१८ | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|
| ओअ‍ॅण्डएम खर्च | १८४.३६ | १७०.८१ | २०४.८४ | २२३.३६ | २४४.९७ |
| दीर्घकालीन कर्जावर व्याज | १०३.६७ | १०४.७५ | १०८.३५ | ११४.०३ | १२५.८९ |
| चालू भांडवलावर व्याज | ११.८१ | १२.८५ | १२.५२ | १५.०१ | १४.६८ |
| इतर वित्तीय आकार | ०.०३ | ०.०३ | | | |
| घसारा | ११८.५६ | १३१.०६ | १४२.३७ | १५४.७२ | १७१.५८ |
| समभागांवर परतावा | १४८.१३ | १५७.१० | १६९.१८ | १८२.६७ | २०१.०६ |
| प्राप्तीकर | ३४.०४ | २३.६७ | २३.६७ | २३.६७ | २३.६७ |
| आपत्कालीन साठ्यात योगदान | ६.८८ | ७.४७ | ८.०४ | ८.६६ | ९.४९ |
| **वार्षिक पारेषण आकार** | **६०७.४७** | **६०७.७३** | **६६८.९७** | **७२२.११** | **७९१.३४** |
| वजा: दरेतर उत्पन्न | १०८.२० | १६.८९ | १८.११ | १९.४९ | २०.९७ |
| **एकूण पारेषण शुल्क** | **४९९.२७** | **५९०.८३** | **६५०.८६** | **७०२.६२** | **७७०.३७** |
| बेरीज: फायदा | ६.८८ | ३.६१ | | | |
| **पारेषण दरपत्रकातून निव्वळ एकूण महसुली आवश्यकता** | **५०६.१५** | **५९४.४४** | **६५०.८६** | **७०२.६२** | **७७०.३७** |

**१.१७ आर्थिक वर्ष २०१५-१६, आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी तफावत/ (अतिरिक्त) आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी तात्पुरती तफावत/ (अतिरिक्त)**

३०. उक्तनिर्देशित गणनावर आधारित राहून आर्थिक वर्ष २०१५-१६, आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी महसूल, निव्वळ हक्क आणि आर्थिक वर्ष २०१५-१६, आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी तफावत/ (अतिरिक्त) खालील तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे आहे :

**तक्ता १-१६: आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी निव्वळ वार्षिक पारेषण आकार आणि तफावत/ (अतिरिक्त)**

रूपये कोटींमध्ये

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी मान्यताप्राप्त आकडेवारी | नियमावलीप्रमाणे मालकी | ग्राहकांसोबत वाटण्यात आलेल्या नियंत्रणयोग्य घटकांमधून कार्यक्षमता फायदा/ (तूट) | अनियंत्रणयोग्य घटक | नियंत्रणयोग्य घटकातून फायदा/ (तूट) यांच्या परिणामानंतर निव्वळ मालकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **महसूल** | | | | | |
| | - पारेषण शुल्क | | ४४५.१९ | | | ४४५.१९ |
| | - दरेतर उत्पन्न | १११.३० | १०८.२० | | | १०८.२० |
| २. | **एकूण महसूल** | | **५५३.३९** | | | **५५३.३९** |
| | | | | | | |
| ३. | **खर्च** | | | | | |
| १. | कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | १९७.८७ | १९७.२३ | १२.८७ | ०.०० | १८४.३६ |
| २. | घसारा | ११५.२१ | ११८.५६ | | | ११८.५६ |
| ३. | दीर्घकालीन कर्ज भांडवलावर व्याज | १०१.१६ | १०३.६७ | | | १०३.६७ |
| ४. | चालू भांडवलावर | ११.७९ | ११.८१ | | | ११.८१ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | व्याज | | | | | |
| ५. | इतर वित्त शुल्क | ०.०० | ०.० | | | ०.०३ |
| ६. | फायदा | ०.०० | ६.८८ | | | ६.८८ |
| ७. | आपत्कालीन साठा | ६.८३ | ६.८८ | | | ६.८८ |
| ८. | प्राप्तीकर | ६६.७४ | ३४.०४ | | | ३४.०४ |
| ९. | समभागांवर परतावा | १४६.४६ | १४८.१३ | | | १४८.१३ |
| **२** | **एकूण खर्च** | **६४६.०६** | **६२७.२२** | | | **६१४.३५** |
| | | | | | | |
| **३** | **शुद्ध तफावत/ (अतिरिक्त) आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी (१-२)** | | | | | **६०.९७** |

**तक्ता १-१७: आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी निव्वळ वार्षिक पारेषण आकार आणि तफावत/ (अतिरिक्त)**

रूपये कोटींमध्ये

| **अनु क्र.** | **तपशील** | **आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी मान्यताप्राप्त आकडेवारी** | **नियमावलीप्रमाणे मालकी** | **ग्राहकांसोबत वाटण्यात आलेल्या नियंत्रणयोग्य घटकांमधून कार्यक्षमता फायदा/ (तूट)** | **अनियंत्रणयोग्य घटक** | **नियंत्रणयोग्य घटकातून फायदा/ (तूट) यांच्या परिणामानंतर निव्वळ मालकी** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **महसूल** | | | | | |
| | - पारेषण शुल्क | | | | | ५०९.०७ |
| | - दरेतर उत्पन्न | १६.८३ | | | | १६.८९ |
| २. | **एकूण महसूल** | | | | | **५२५.९७** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| **३.** | **खर्च** | | | | | |
| १. | कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | १७९.१८ | १७७.३८ | ६.५७ | ०.०० | १७०.८१ |
| २. | घसारा | ११७.५९ | १३१.०६ | | | १३१.०६ |
| ३. | दीर्घकालीन कर्ज भांडवलावर व्याज | १०३.०८ | १०४.७५ | | | १०४.७५ |
| ४. | चालू भांडवलावर व्याज | १२.४१ | १६.३८ | -१.७६ | | १२.८५ |
| ५. | इतर वित्त शुल्क | ०.०० | ०.०३ | | | ०.०३ |
| ६. | फायदा | ०.०० | ३.६१ | | | ३.६१ |
| ७. | आपत्कालीन साठा | ७.४३ | ७.४७ | | | ७.४७ |
| ८. | प्राप्तीकर | ६६.७४ | २३.६७ | | | २३.६७ |
| ९. | समभागांवर परतावा | १५५.३८ | १५७.१० | | | १५७.१० |
| **२** | **एकूण खर्च** | **६४१.८२** | **६२१.४४** | | | **६११.३३** |
| | | | | | | |
| **३** | **शुद्ध तफावत/ (अतिरिक्त) आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी (१-२)** | | | | | **८५.३७** |

**तक्ता १-१८ : आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी निव्वळ वार्षिक पारेषण आकार आणि तफावत/ (अतिरिक्त)**

रूपये कोटींमध्ये

| अनु क्र. | तपशील | निव्वळ पात्रता |
|---|---|---|
| **१** | **महसूल** | **६७९.७९** |
| | - पारेषण शुल्क | ६६१.६८ |
| | - दरेतर उत्पन्न | १८.११ |
| **२.** | **एकूण महसूल** | **६७९.७९** |
| | | |
| **३.** | **खर्च** | |
| १. | कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | २०४.८४ |
| २. | घसारा | १४२.३७ |
| ३. | दीर्घकालीन कर्ज भांडवलावर व्याज | १०८.३५ |
| ४. | चालू भांडवलावर व्याज | १२.५२ |
| ५. | इतर वित्त शुल्क | ०.०० |
| ६. | फायदा | ८.०४ |
| ७. | आपत्कालीन साठा | २३.६७ |
| ८. | प्राप्तीकर | १६९.१८ |
| ९. | समभागांवर परतावा | ६६८.९७ |
| **२** | **एकूण खर्च** | |
| | | |
| **३** | **शुद्ध तफावत/ (अतिरिक्त) आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी (१-२)** | **-१०.८२** |

## १.१६ मागील वसुलींसह एआरआर

३१. मान्यताप्राप्त तफावतीवर आधारित राहून आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी सुधारित एआरआर आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ यांच्या प्रत्यक्ष तफावत/ (अतिक्ति)वर आधारित राहून मागील वसुलींची एकूण रक्कम आणि भविष्यातील दरपत्रकाचा पुढे नेण्याचा खर्च खाली दिल्याप्रमाणे आहे:

**तक्ता १-१९: आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये वसूल करण्याची रक्कम**

रूपये कोटींमध्ये

| तपशील | | एमवायटी आदेशानुसार | एआरआरनुसार |
|---|---|---|---|
| एमवायटी आदेशात मान्यताप्राप्त मागील वसुली | अ | -३०.९४ | -३०.९४ |
| आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी तफावत/ (अतिरिक्त) | ब | -३१.९४ | ६०.९७ |
| मागील वसुलीसह एआरआर | क- ए बी | -६२.८८ | ३०.०२ |
| पुनर्रिक्षण अर्जाचा परिणाम | ड | | २.८६ |
| आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी तफावत/ (अतिरिक्त) | इ | | ८५.३७ |
| आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी तफावत/ (अतिरिक्त) | फ | | -१०.८२ |
| आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी राखून ठेवण्याचा खर्च | ग | | ०.२१ |
| आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी राखून ठेवण्याचा खर्च | ह | | ४.७६ |
| आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी राखून ठेवण्याचा खर्च | प | | १०.९८ |
| आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी राखून ठेवण्याचा खर्च | ज | | १३.६४ |
| **आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये परावर्तित करण्याची एकूण रक्कम** | **क- एकूण (क ते ज)** | | **१३७.०४** |

३२. आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी निव्वळ वार्षिक पारेषण शुल्क मागील वर्षांची तफावत लक्षात घेता खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता १-२० : आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी निव्वळ एआरआर**

रूपये कोटींमध्ये

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० |
|---|---|---|---|
| १. | आर्थिक वर्ष २०१७-१८ पर्यंत मागील वसुली | १३७.०४ | ०.०० |
| २. | स्टँड अलोन एआरआर | ७०२.६२ | ७७०.३७ |
| ३. | **एकूण एआरआर** | **८३९.६६** | **७७०.३७** |

## १.१९ माननीय आयोगाकडे विनंती

३३. याचिकाकर्ता आदराने माननीय आयोगाकडे विनंती करत आहे की त्यांनी:

- एमवायटी नियमावली २०११ मध्ये नमूद मार्गदर्शक तत्वे आणि तत्वांनुसार आर्थिक वर्ष २०१५-१६ साठीचे अचूक समायोजन स्वीकारावे.
- एमवायटी नियमावली २०१५ मध्ये नमूद मार्गदर्शक तत्वे आणि तत्वांनुसार आर्थिक वर्ष २०१६-१७ साठीचे अचूक समायोजन स्वीकारावे.
- एमवायटी नियमावली २०१५ मध्ये नमूद मार्गदर्शक तत्वे आणि तत्वांनुसार आर्थिक वर्ष २०१७-१८ साठीचे अचूक समायोजन स्वीकारावे.
- टाटा पॉवरच्या निर्मिती उद्योगाकडून पारेषणाशी संबंधित मालमत्तांचे हस्तांतरण टाटा पॉवरच्या पारेषण उद्योगाला करण्याची परवानगी द्यावी.
- एमवायटी नियमावली २०१५ मध्ये नमूद मार्गदर्शक तत्वे आणि तत्वांनुसार आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठीचे अचूक समायोजन स्वीकारावे.
- कोणत्याही बाबी वगळल्या गेल्यास/ चुका/ एकूण बेरजेतील तफावत/ त्रुटी क्षमा कराव्यात आणि टाटा पॉवरला सदर सादरीकरणात भर घालण्याची/ बदल करण्याची/ सुधारणा करण्याची/ दुरूस्ती करण्याची आणि भविष्यातील तारखेला आवश्यकतेनुसार सादरीकरण करण्याची परवानगी द्यावी.
- प्रकरणाची तथ्ये आणि परिस्थिती यांचा विचार करून आयोगाला योग्य आणि लागू होतील अशा वाटतील असे कोणतेही पुढील आणि इतर आदेश पारित करावेत.